8/10

Suchita Gurunath Surwase

Sub:- Geography

Paper:- XVII   Sem:- VI

Class:- B.A. T.Y   (2022-23)

प्र.१ला पर्यावरण भूगोलाचा अर्थ व व्याख्या सांगून स्वरूप स्पष्ट करा ?

प्रस्तावना :-

पर्यावरण भूगोल या विषयाला अलीकडील काळात विशेष महत्त्व प्राप्त झाले 1972 मध्ये स्टॉकहोम येथे झालेल्या या विषयावरील जागतिक परिषदेनंतर विकसनशील देशांत पर्यावरणाच्या समस्यांकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात झाली. कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक विकास साधताना पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक आहे.

जगामध्ये पर्यावरणाच्या अध्ययनास फारच महत्त्व प्राप्त झाले आहे, पर्यावरण हा शब्द अलीकडे सर्वांच्या जिव्हाळ्याचा शब्द झाला असून त्याला परवलीच्या शब्दाचा अर्थ प्राप्त झालेला आहे.

Environ म्हणजे to surround या मूळ फ्रेंच भाषेतील शब्दापासून Environment असा इंग्रजी शब्द प्रचलित झाला आहे.

## पर्यावरण भूगोलाच्या व्याख्या :-

पर्यावरणशास्त्र अथवा पर्यावरण भूगोलाच्या व्याख्या खालील प्रमाणे आहेत.

① वर्नार्ड नेबेल :-

सजीवांचे पृथ्वीवरील अस्तित्व, निसर्ग नियमांनी अशा संतुलित परिसंस्थावर अवलंबून आहे म्हणून नेबेल यांच्या मते, पर्यावरण शास्त्र म्हणजे विविध परिसंस्था प्रणालीचे परस्पर संबंधातील संतुलन मुळकत-यांचे शास्त्रीय अध्ययन होय.

② डॅनियल डी. चिरास :-

यांच्या मते, "पर्यावरणशास्त्र हे जैविक व अजैविक घटक व त्यांचे पर्यावरण व विशेषकरून त्या घटकातील परस्पर क्रियांच्या अभ्यासाचे शास्त्र होय.

③ जोनस एर्क यांच्या मते :-

"पर्यावरण शास्त्र म्हणजे पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनाच्या पर्यावरणावर असणारा प्रभाव यांचा अभ्यास होय" पर्यावरणशास्त्र हे मूलतः गुंतागुंतीचे शास्त्र असून जैविक, प्राकृतिक, आर्थिक, राजकीय इ. ज्ञानशाखांच्या पर्यावरणशास्त्रा हा एकात्मिक अविष्कार आहे.

④ पर्यावरणातील साधनसंपदांचा संवर्धन व्यवस्थापन व नियोजनात्मक विश्लेषणाच्या आणि मानवी हिताच्या दृष्टीने केलेल्या शास्त्रीय अभ्यास पर्यावरणशास्त्र असे म्हणतात.

⑤ पर्यावरणातील नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांच्या मानवी जीवनावरील प्रभावाच्या पद्धतीशीर शास्त्रीय व संकलित अभ्यास म्हणजे पर्यावरण शास्त्र होय.

⑥ मानवी अस्तित्व व सजीवांच्या समुत्सुकतेवर परिणाम करणाऱ्या पर्यावरणाच्या विविध अंगांचे आणि घटकांचे शास्त्रीय दृष्टीकोनातून सविस्तर अध्ययन म्हणजे पर्यावरणशास्त्र होय.

अशा प्रकारे पर्यावरणाच्या व्याख्या करण्यात आल्या आहेत.

## पर्यावरण भूगोलशास्त्राचे स्वरूप

पर्यावरणशास्त्राचे स्वरूप अतिशय व्यापक आहे विविध नैसर्गिक व सामाजिक शास्त्रांचा संकलित समन्वय पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासात अभिप्रेत असल्याने पर्यावरणशास्त्र हा विषय सर्वस्पर्शी मानला जातो पर्यावरण भूगोलाच्या अभ्यास विविध प्रश्नांची शास्त्रीय उकल सर्वस्पर्शी उकल करून घेणे आवश्यक आहे. पुढील आकृतीवरून प्राकृतिक व जीवनशास्त्रांची जोड अथवा साखळी कशी कार्यरत असते ते स्पष्ट होते.



पर्यावरणातील विविध घटकांच्या आपापसात क्रिया / प्रतिक्रिया होऊन पर्यावरणीय आकृतिबंध व (Enviromental Pattenns/systmes) तयार होतात पर्यावरण शास्त्रात हे आकृतिबंध अभ्यासले जातात पर्यावरणातील घटक गतिमान असल्याने मानव पर्यावरण आंतरसंबंध सकीर्ण होत असतात पर्यावरणातील संकीर्णता नैसर्गिक घटकामुळे किंवा मानवी हस्तक्षेपामुळे जटिल होते उदा. मानवाने अर्थकारणा-साठी खनिजसंपत्तीच्या अनिर्बंध वापर केल्याने मानव-संपदा गुणोत्तर प्रतिकूल असंतुलित होत आहे.

भूगोलशास्त्रीय तत्त्वांचा अभ्यास पर्यावरणात्मक समस्यांचे मूळ स्वरूप समजावून घेण्यासाठी उपयोगी पडतो.